1

विद्यमान कोर्ट मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी / ... कोर्ट वर्धा

केस नं. एस.सी.सी. ७६३०/२०२५

गणेश कृष्णाजी राउत विरूध्द विनोद देविदासजी खोडे

तक्रारकर्ता : गणेश कृष्णाजी राउत ची

शपथेवर पडताळणी

मी सदर केसमधील तक्रारकर्ता,

नाव : गणेश कृष्णजी राउत

वय ४५ वर्षे, कामधंदा : शेतीव्यवसाय

ORDER

राहणार : गणेशनगर बेरगाव (मेघे) वर्धा

Witness present before Court today deposed the contents of his affidavit to be true & correct. Hence, it is Read & Recorded.
Sd/-
JMFC
28/01/2026

तालुका व जिल्हा वर्धा महाराष्ट्र

शपथेवर खालीलप्रमाणे पडताळणी सादर करीत आहे.

१. मी सदर केसमधील तक्रारकर्ता आहे. सदर केसमधील आरोपीशी माझे अनेक वर्षापासुन संबंध आहेत.

२. तक्रारकर्त्याला अशी माहीती मिळाली की सदर केसमधील आरोपीने त्याचे नावे तळेगांव (टालटुले) येथे असलेली शेतजमीन सर्व्हे नंबर ५३५/अे एकुण शेतजमीन १.८३ एच.आर. पैकी ०.८१ विकावयास काढली आहे. त्यामुळे तक्रकर्त्याने सदर कारणाने त्याची भेट घेतली. सदर बाबतीत व्यवहाराची बोलणी झाल्यावर असे ठरले की आरोपी सदर शेतजमीन ०.८१ ही तक्रारर्त्याला रू.५५०००० या किमतीला विकेल.

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.01.28 16:56:49 +0530

३. तक्रारकर्ता व आरोपी यांचेमध्ये विक्री करारनामा होण्यापुवी दिनांक १३.७.२०२३ रोजी आरोपी तक्रारकर्त्याचे घरी आला व त्याने त्याचेवर सदर शेतजमीवर असलेले कृषी कर्ज फेडण्यासाठी रू.१७८३०० उधार देण्याची विनंती

JUDICIAL MAGISTRATE WARDHA

केली. तक्रारकर्त्याने ही रक्कम आरोपीला दिली व त्यात आरोपीने युनियन बँक चे कृषी कर्ज फेडले.

४. आरोपी व तक्रारकर्ता यांच्यात ठरल्याप्रमाणे आरोपीने ऊपरोक्त शेतजमीनीचा तक्रारकर्त्या सोबत दिनांक १९.७.२०२३ रोजी नोंदणीकृत करारनामा करून दिला. सदर करारनामा करणेचे वेळी तक्रारत्याने आरोपीला आधी ठरल्यानुसार रू.५००००० (रू.पाच लाख) फक्त दिले व ती रक्कम मिळाल्याचे आरोपीने नोंदणीकृत करारनामा दिनांक १९.७.२०२३ मध्ये कबुल केले आहे.

५. तक्रारकर्ता व आरोपी यांचेत झालेल्या नोंदणीकृत करारनाम्यानुसार विक्रीची मुदत जवळ आल्यावर जेव्हा तक्रारकत्याने विक्रीसाठी आरोपीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तेव्हा आरोपी विक्री करून देण्यास टाळाटाळ करू लागला. तेव्हा तक्रारकत्याने आरोपीला अॅड सचिन कुरझडकर यांचे मार्फत नोटीस दिला सदर नोटीस दिनांक १४.११.२५ रोजीचा दिनांक १६.११.२०२५ रोजी पाठविला परंतु नोटीस मिळाल्यावर देखील नोंदणी कृत करारनाम्यात कबुल करूनही आरोपीने विक्री करून दिली नाही व त्यासाठी संपर्कही साधला नाही.

६. जेव्हा तक्राकर्ताचे लक्षात आले की आरोपीची तक्रारकत्यास सदर शेतजमीनीची विक्री करून देण्याची ईच्छा नाही तेव्हा तक्रारकत्याने आरोपीला त्याची आरोपीकडुन घेणे असलेली रकम रू.६७३५०० (रू.सहा लक्ष त्र्याहात्तर हजार पाचशे फक्त) ची मागणी केली. सदर रू.६७३५०० घेणे रकमेचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| रू.५००००० | दि.१९.७.२०२३ रोजी नोंदणीकृत कराराचे वेळी आरोपीला दिलेली रकम |
| रू. ६७४४० | नोंदणीकृत करारनाम्याचे वेळी स्टॅप डयुटी व नोंदणीचा खर्च |
| रू.१०६०६० | आरोपीला १३.७.२०२३ रोजी बँकेचे कर्ज फेडण्यासाठी दिलेल्या रू.१७८३०० या रकमेपैकी आरोपीने रू.७२२४० ही रकम तक्रारकर्त्यास परत केली आहे सबब |

रू.१७८३०० - रू.७२२४० रू. १०६०६०

रू.६७३५०० आरोपीकडुन एकुण घेणे असलेली रकम.

रू. सहा लक्ष त्र्याहात्तर हजार पाचशे फक्त

७. आरोपीने तक्रारकर्त्यास ठरल्याप्रमाणे विक्री करून न दिल्याने तक्रारकर्त्याने आरोपीला त्याचेकडुन घेणे असलेल्या रू.६७३५०० या रकमेची वारंवार मागणी केली असता आरोपीने तक्रारकर्त्यास दिनांक १.९.२०२५ रोजी आरोपीवर असलेल्या देयतेपोटी रू.६७३५०० या रकमेचा धनादेश क्र.०५९९५३ दिनांक १.९.२०२५ या तारखेचा जो बँक ऑफ इंडिया रामनगर वर्धा शाखेवर आहरीत होता तक्रारकर्त्यास आणुन दिला. सदर धनादेश देतांना आरोपीने तक्रारकर्त्यास तोंडी वचन दिले की सदर धनादेश हा पारीत होइल.

८. तक्रारकर्त्याने सदर धनादेश क्र.०५९९५३ रू.६७३५०० दिनांक १.९.२०२५ जो बँक ऑफ इंडिया रामनगर वर्धा शाखेवर आहरित होता हा त्याचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी बँक वर्धा शाखेत दिनांक २०.९.२०२५ रोजी जमा केला असता तो दिनांक २२.९.२०२५ रोजी एच.डी.एफ.सी. बँक वर्धा शाखेने "फंडस इनसफीशियंट" असा शेरा देउन परत केला.

९. त्यानंतर तक्रारकर्त्याने आरोपीला त्याचे वकीलांमार्फत दिनांक १४.१०.२०२५ रोजी कायदेशीर नोटीस पाठविला. सदर नोटीस मध्ये आरोपीला रू.६७३५०० या अनादरीत धनादेश रकमेचे सदर नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसांचे आत प्रदान करण्याची सुचना करण्यात आली. सदर नोटीस आरोपीला दिनांक १७.१०.२०२५ रोजी मिळाला परंतु आरोपीने त्यास नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसात अनादरीत धनादेशाचे रकमेचे प्रदान न केल्यामुळे सदर तक्रारकेस आरोपीविरूध्द दाखल करण्यत आली आहे.

१०. तक्रारकर्त्याने सदर तक्रार केसमध्ये दाखल केलेले सर्व दस्तावेज खरे व बरोबर आहेत. सदर तक्रारकेस मधील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे

(A. S. Kamrao)
Adv.

टक्रारकर्त्याचे वकील

तक्रारकर्ता

5

# सत्यापन

मी नामे गणेश कृष्णाजी राउत, वय: ४५ वर्षे कामधंदा : शेतीव्यवसाय राहणार वार्ड नंबर ३ गणेशनगर बोरगांव (मेघे) वर्धा तालुका व जिल्हा वर्धा सत्यापित करतो की वरील पडताळणी मधील संपुर्ण मजकुर हा माझे माहितीप्रमाणे व सांगण्यावरून लिहीलेला असुन संपुर्ण सत्य व बरोबर आहे. मी तो वाचुन व योग्य रितीने समजुन घेऊन त्यावर आज दिनांक 12/1/ २०२६ रोजी सही केली आहे.

गणेश राउत

सत्यापित करणार

मी सत्यापन करणार गणेश कृष्णाजी राउत

यास ओळखतो. त्याने यावर माझे समक्ष सही केली.

CA-S-Kannao Adv-

ॲडव्होकेट वर्धा

affirmed before me
on this ______ day of ______
by Shri ______
who is identified before me by
Shri ______ Adv. of personally known,

Asstt. Supdt.
Court of C.J.J.L. Wardha

5

# शपथपत्र

मी गणेश कृष्णाजी राउत, वय : ४५ वर्ष, कामधंदा: शेतीव्यवसाय राहणार वार्ड नंबर ३ गणेशनगर बोरगांव मेघे वर्धा तालुका व जिल्हा वर्धा शपथपुर्वक सांगतो की वरील पडताळणीतील संपुर्ण माहिती व दाखल दस्तऐवज खरे असुन ते दस्तऐवज मी प्रत्यक्ष विद्यमान कोर्टात दाखल केले असुन ते संपुर्ण दस्तऐवज केस संबधी आहेत. सदर केसमधील संपुर्ण दस्तएवज खरे व बरोबर आहेत.

सबब सदर शपथपत्रावर आज दिनांक 12/1/2026 २०२५ रोजी सही केली आहे.

शपथपत्र करणार

Rs. 5 COURT FEE INDIA FIVE RUPEES

मी शपथपत्र करणार गणेश कृष्णाजी राउत यास ओळखतो. त्याने यावर माझे समक्ष सही केली.

(A.S. Konnao) Adv.

ॲडव्होकेट वर्धा

Solemnly affirmed before me on this 12th day of Jan by Shri Ganesh Krushnaji Raut who is identified before me by Adv. A.S. Kongao Shri ... whom I personally know.

Age 45, R/o Borgaon Meghe, Teh. & Dist. Wardha

12/1/26

CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA

Supdt. of C.J.M. Wardha

12/1/26

CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA